N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** जोडभावीपे **Year (वर्ष):** 2022
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0103 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2022 13:51 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 31/01/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/02/2022
**Time From (वेळेपासून):** 23:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 02:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/03/2022 **Time (वेळ):** 13:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2022 13:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जोडभावी पेठ पोलीस चौकी,पुणे सोलापूर हायवे रोडवरील हट,सोलापूर व पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** अविनाश पांडुरंग खटके
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बकोरी, ता हवेली ,जि पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बकोरी, ता हवेली ,जि पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9921991121

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश श्रीकांत कुलकर्णी | | | 1. जोडभावीपेठ पोलीस स्टेशन, ,सोलापूर शहर ,जोडभावीपे,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 08.03.2022 मी अविनाश पांडुरंग खटके, वय 30 वर्षे, व्यवसाय - बांधकाम कन्स्ट्रक्शन, रा. बकोरी, ता. हवेली जि. पुणे, मो. क्रं. 9921991121, समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असुन पुणे वाघोली परिसरात बांधकाम कन्स्ट्रक्शन चा व्यवसाय करुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.माझा मेहुणा नामे सौरभ राजेंद्र सुभेदार याचे व सोलापूर येथील आमच्या नात्यातील अल्पवयीन मुलीचे प्रेम संबंध असल्याने त्याने सदर मुलीस दि. 12/01/2022 रोजी तीच्या घरी कोणास काहीएक न सांगता त्याचे सोबत पुणे येथे त्याच्या घरी घेवुन गेला होता. त्यानंतर तो सदर मुलीस मुंबई येथे घेवुन गेला. सदरबाबत मुलीच्या आईला समजल्यानंतर तीने माझा मेहुणा सौरभ याच्याविरुध्द जोडभावीपेठ पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे तक्रार दिली असुन त्यावरुन जोडभावीपेठ पोलीस स्टेशन येथे दि. 15/01/2022 रोजी गु.र.न 26/2022 भा.द.वि कलम 363, 366 अ, प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास जोडभावी पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक दिनेश कुलकर्णी हे करीत आहेत. दि. 19/01/2022 रोजी सहा. पोलीस निरीक्षक कुलकर्णी हे पुणे येथे येवुन मला, माझी सासु व मोठया मेहुण्यास तपासकामी सोलापूर जोडभावी पोलीस स्टेशन येथे दि. 20/01/2022 रोजी 14:00 वा. येण्यास सांगीतले व तसे त्याबाबतचे समजपत्र देखील दिले होते. त्याअनुषंगाने मी, माझी सासु व मोठा मेहुणा असे जोडभावीपेठ पोलीस स्टेशन, सोलापूर येथे येवुन कुलकर्णी साहेबांना भेटलो. सदरवेळी त्यांनी आम्हाला मेहुणा सौरभ याच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची हकीकत सांगीतली व मेहुणा सौरभ व मुलीस पोलीस स्टेशन येथे हजर करण्यास सांगीतले. त्यावर आम्ही सौरभ व मुलीचा शोध घेवुन मुलीला दि. 22/01/2022 रोजी जोडभावीपेठ पोलीस स्टेशन येथे आणुन हजर केले. त्यानंतर कुलकर्णी साहेबांनी मेहुणा सौरभ यास देखील जोडभावीपेठ पोलीस स्टेशन येथे हजर करण्यास सं◌ागीतल्याने आम्ही दि. 25/01/2022 रोजी सौरभला आणुन हजर केले. त्यावेळी कुलकर्णी साहेबांनी सौरभ यास अटक केलेली आहे.दि. 25/01/2022 रोजी आम्ही सौरभ यास हजर करण्याकरीता कुलकर्णी साहेबांना भेटलो तेंव्हा कुलकर्णी साहेबांनी मला सदर गुन्हयात मी, माझी पत्नी, माझी सासु, मोठा मेहुणा, मेहुणी व तीचा नवरा (माझा साडु) असे देखील आरोपी होत असुन जर आम्हाला आरोपी करायचे नसेल तर प्रत्येकी 50,000/- प्रमाणे 03 लाख रुपये द्यावे लागतील असे असे सांगुन सोमवार दि. 31/01/2022 रोजी भेटण्या करीता जोडभावीपेठ पोलीस चौकी येथे येण्यास सांगीतले होते.पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या असलेल्या गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने कोणालाही कोणतीही रक्कम द्यायची गरज नसते याबाबत मी खात्री केली असुन सदरची रक्कम ही लाचेची असल्याचे माझी खात्री झाली. माझी सहा. पोलीस निरीक्षक, कुलकर्णी यांना कोणतीही लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने माझा व नमुद पोलीस अधिकारी कुलकर्णी यांचेशी यापुर्वीचा कोणताही वाद विवाद तसेच पैशाच्या देवाणघेवाणीचा कोणताही व्यवहार प्रलंबित नसल्याने तसेच मला त्यांना लाच स्वरुपात कोणतीही रक्कम द्यायची इच्छा नसल्याने मी नमुद सहा. पोलीस निरीक्षक, कुलकर्णी, जोडभावीपेठ, पोलीस स्टेशन, सोलापूर शहर यांचेविरुध्द तक्रार देण्याकरीता दि. 31/01/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो व आपण त्यांचेवर

योग्य ती कारवाई करावी अशी विनंती केली व श्री. उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष लेखी तक्रार नोंदवली. सदर तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी पोनि. महाडिक यांनी श्री. नितीन बाळासाहेब खेंदाड, पद - सांख्यिकी अन्वेषक, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर व संगमनाथ गुरुनाथ सोलापूरे, पद- आरोग्य सहा, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांना पंच म्हणून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरीषद, सोलापूर यांचेकडून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचासमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. तसेच सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि महाडिक यांनी वाचून सह्या केल्या. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी सुचना दिल्या की, मी व माझ्या सोबत पंच नं 1 श्री. नितीन खेंदाड असे जोडभावीपेठ, पोलीस चौकी येथे जावून सहा. पोलीस निरीक्षक कुलकर्णी यांची भेट घेवून माझा मेहुणा सौरभ यांच्यावर दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा करावी त्यावेळी त्यावेळी कुलकर्णी यांनी त्यांना तसेच त्यांचे इतर नातेवाईक यांना आरोपी न करण्याकरीता लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे. त्याचप्रमाणे ते पोलीस चौकीत उपलब्ध नसल्यास त्यांना फोन करण्याची गरज भासल्यास स्पिकर ऑन करुन फोन करावा अशा सुचना दिल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर मला व पंच 1 खेंदाड यांना जोडभावीपेठ पोलीस चौकी येथे पाठविण्यासाठी माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस अडकावून माझ्याकडील चारचाकी वाहन हुंडाई कंपनीची क्रेटा क्रं. MH 12 SK 9555 मधुन 15.54 वा. चे सुमारास पाठवले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 खेंदाड असे चारचाकी वाहनामधुन जोडभावीपेठ पोलीस चौकी, सोलापूर येथे जावून तेथे सपोनि कुलकर्णी यांची पंच खेंदाड यांच्या समक्ष भेट घेण्याकरिता सपोनि कुलकर्णी हे ज्या ठिकाणी बसतात त्या खोलीत जावुन पाहिले असता तेथे ते नव्हते. सपोनि कुलकर्णी हे नेहमी माझ्याशी व्हटसअप मधील ऑडीओ कलवरच संभाषण करीत असल्यामुळे मी माझा व्हटसअप मोबाईल क्रं. 9921991121 वरुन कुलकर्णी यांचा व्हटसअप मोबाईल क्रं. 9765900100 यावर फोन केला परंतु त्यांनी तो रिसिव्ह केला नाही. म्हणुन तेथे पोलीस चौकीमध्ये असलेल्या इतर पोलीसांना कुलकर्णी साहेब कोठे गेले आहेत असे विचारले असता त्यांनी कुलकर्णी साहेब कोर्टात गेले असल्याचे सांगीतले म्हणुन आम्ही त्यांची वाट बघत तेथेच चौकीच्या आवारात थांबलो. परंतु बराच वेळ होवुन देखील सपोनि कुलकर्णी न आल्याने मी व पंच खेंदाड अँन्टी करप्शन कार्यालय, सोलापूर येथे 17.40 वा. चे सुमारास परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर काढून तो बंद करून पंच खेंदाड व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यामुळे सापळा कारवाई तुर्त थांबुवन पुन्हा जर सपोनि कुलकर्णी यांनी माझ्याशी संपर्क साधुन लाचेच्या रक्कमेची मागणी केल्यास सदरबाबत सापळा कारवाई करण्याचे नियोजित केले. त्यानंतर दि. 31/01/2022 रोजीच्या पडताळणी कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा तसेच माझा जबाब अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कार्यालयात नोंद करण्यात आला व मला, पंचाना तसेच सापळा पथकाला झाले कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या योग्य त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर दि. 01/02/2022 रोजी सकाळी 09.05 वा. सुमारास स.पो.नि कुलकर्णी यांनी त्यांचा व्हटस्अप मोबाईल क्र. 9765900100 वरुन माझे व्हटस्अप मोबाईल क्र. 9921991121 वर व्हटस्अप कल करुन मला दि. 01/02/2022 रोजी संध्याकाळी 06.30 वा.चे दरम्यान पुणे येथे भेटण्यास सांगितले. त्यावरुन सपोनि कुलकर्णी यांच्याकडुन माझ्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी होईल अशी शक्यता वाटल्याने मी अँन्टी करप्शन कार्यालय, सोलापूर येथे जावुन पोनि महाडिक यांच्याशी संपर्क साधुन पंचासमक्ष झाला प्रकार सांगीतला व सपोनि कुलकर्णी हे माझ्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याची शक्यता असल्याबाबत कळवुन सपोनि कुलकर्णी यांच्यावर पुणे येथे पडताळणी कारवाई करावी अशी विनंती केली. त्याअनुषंगाने माझ्या तक्रारीवर पुणे येथे जावुन पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांचे कार्यालयातील पोना/ कोष्टी, पोशि/ पवार, पोशि/ सण्णके व शासकिय वाहनाचे चालक पोक/ शाम सुरवसे यांना त्यांचे कक्षामध्ये बोलावुन घेवुन योग्य त्या सुचना दिल्या व पडताळणी तसेच सापळा कारवाईकरीता लागणारे आवश्यक साहित्य शासकीय वाहन महिंद्रा कंपनीची स्कर्पिओ क्रमांक एम.एच.13 पी 0323 या शासकीय वाहनामध्ये ठेवले. त्यानंतर मी माझ्याकडील क्रेटा वाहनातुन व पोनि महाडिक, दोन्ही पंच व सापळा पथक असे पुणे करीता दुपारी 01.00 वा.चे सुमारास निघालो. व सायंकाळी 06.00 वा. चे सुमारास पुणे येथील सेंट्रल बिल्डिंग येथे पोहचलो. तेथे पोहोचल्यावर पोनि महाडिक यांनी त्यांच्या शासकीय वाहनात असलेले पोशि पवार, पोशि सण्णके व पोना कोष्टी तसेच चालक सुरवसे यांना वाहनामधुन खाली उतरुन थोडेसे बाजुला थांबण्याच्या सुचना दिल्या व मला शासकीय वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. व प्रवासामध्ये मला सपोनि कुलकर्णी यांचा फोन आला होता का? असे विचारले असता मला सपोनि कुलकर्णी यांचा कोणताही फोन आला नसल्याचे मी त्यांना सांगीतले. त्यानंतर सपोनि कुलकर्णी यांनी मला फोन करुन सायं. 06.30 वा. पुण्यामध्ये भेटण्याबाबत सांगीतले परंतु पुण्यातील भेट घेण्याचे निच्छित ठिकाण सांगीतले नसल्याने सदरचे ठिकाण निच्छित करण्याकरीता पोनि महाडिक यांच्या सुचनेवरुन मी माझा व्हटस्अप मोबाईल क्रमांक. 9921991121 वरुन कुलकर्णी यांचा व्हटसअप मोबाईल क्रं. 9765900100 यावर 18.25 वा चे सुमारास फोन केला व स्पीकर फोन ऑन करुन संभाषण केले. सदरवेळी मी सपोनि कुलकर्णी यांना कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी मी कोनगांव, ठाणे येथे असल्याचे सांगितले. सदरवेळी मोबाईल सिग्नल रेंज नसल्यामुळे व्हटस्अप कल कट झाला. त्यानंतर काही वेळातच सपोनि कुलकर्णी यांचा माझे मोबाईल क्रंमाकावर रेग्युलर कल आला. सदरवेळी मी त्यांच्याशी स्पिकरफोन ऑन करुन संभाषण केले. सदरवेळी कुलकर्णी यांनी मी कोनगांववरुन निघालो असल्याबाबत सांगीतले. मी त्यांना भेटण्याचे ठिकाण विचारले असता त्यांनी मला हडपसर येथील गाडी तळाजवळील मस्के हस्पीटल येथे येण्यास सांगीतले व ते तेथे आठ ते नऊ च्या दरम्यान तेथे पोहचतील असे सांगीतले. सदरवेळी झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी व्हइसरेकर्डर द्वारे ध्वनीमुद्रीत करुन घेतले. सपोनि कुलकर्णी यांनी मला भेटण्याकरीता हडपसर येथील गाडी तळाजवळील मस्के हस्पीटल येथे बोलाविले असल्याने मी माझ्याकडील क्रेटा वाहनातुन व पोनि महाडिक, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांच्या शासकीय वाहनातुन सेंट्रल बिल्डिंग, पुणे येथुन निघुन हडपसर येथील गाडी तळाजवळील मस्के हस्पीटलच्या पुढे काही अंतरावर जावुन रोडच्या कडेला थांबलो. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सापळा पथकातील पोना कोष्टी, पोशि पवार, पोशि सण्णके व चालक सुरवसे यांना शासकीय वाहनासह पुढे काही अंतरावर जावुन थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे ते सर्वजण तेथुन पुढे निघुन गेले. त्यानंतर पोनि महाडिक, दोन्ही पंच व मी असे सपोनि कुलकर्णी यांची सदर ठिकाणी येण्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर रात्रीचे 20.45 वा. पर्यत सपोनि कुलकर्णी सदर ठिकाणी आले नसल्याने किंवा त्यांचा फोन देखील आला नाही म्हणुन पोनि महाडिक यांनी मला व दोन्ही पंचांना माझ्या क्रेटा वाहनात बसण्याच्या सुचना दिल्या व सपोनि कुलकर्णी यांना फोन करणेबाबत मला सुचना देवुन मोबाईलचा स्पिकर फोन ऑन करुन संभाषण करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार मी सपोनि कुलकर्णी यांना सुमारे 20.50 वा चे सुमारास व्हटसअप कल करुन स्पिकर फोन ऑन केला परंतु कुलकर्णी यांनी फोन रिसिव्ह केला नाही. त्यानंतर लागलीच सपोनि कुलकर्णी यांचा मला फोन आला. तो कल मी रिसीव्ह करुन स्पिकर फोन ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये मी सपोनि कुलकर्णी यांना टाईम लागेल का म्हणुन विचारले असता सपोनि कुलकर्णी यांनी मी सध्या वाशीत असुन तुम्ही साडे अकरा ते पावणे बारा वाजेपर्यंत थेऊर फाट

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष                    हा जबाब दिला स.ता.म

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): shivaji savta raut(I (Inspector)) / pcmah84570 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): shivaji savta raut
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pcmah84570

प्रत मिळाली